भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५२७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०७/२०१७

**१) संगनमत करून जुन्या वादाचे कारणावरून मारहान करून जबरीने मोबाईल व पैसे हिस्कावुन नेल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०९/०७/२०१७ चे १८.२३ वा. दर. यातील फिर्यादी आशिष नरेश घोंगडे वय १९ वर्ष रा. येळाकेळी जि. वर्धा हा सनफ्लॅग कंपनी वरठी येथे लोहा भरण्याकरीता ट्रक घेवुन गेला असता लोहा भरून त्याचा ट्रक हा पार्कीक मध्ये उभा केला व अंदाजे सायंकाळी १८.०० वा. दर. यातील आरोपी व त्याचे २ मित्रानी संगनमत करून जुण्या वादाचे कारणावरून फिर्यादीला आरोपीचे ट्रकचे कॉबिन मध्ये टाकुन त्याचे हातपाय बाधुन त्याचे तोंडावर, हातावर, पाठीवर मारहान केले व त्याचे जवळील सॅमसंग कंपनीचा मोबाईल व नगदी २०/रु ते २५/रू जबरीने हिस्कावुन त्यास २० ते २५ कि.मी. अंतारावर ताडोबा रोडने नेवुन फेकुन दिले फिर्यादीचे डि.डि. बयानावरून पो.स्टे. वर्धा शहर येथे अप.क्र.००/१७ कलम ३६७,३९२,३४ भादवी. गुन्हयाचे कागज पत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा.भोंदे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३६७,३९२,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी कारंडे पो.स्टे वरठी हे करीत आहेत.

**२) केबल वायर चोरी करण्याचा प्रयत्न करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २३/०७/२०१७ चे १.१० वा. दर. यातील आरोपीतांनी चिखला माईन्सचे स्टोर रुमचे मागे केबल वायर चोरी करण्याचा प्रयत्नात असतांना फिर्यादीला मिळुन आल्याने व त्याचे ०२ ते ०३ सहकारी पडुन गेले फिर्यादीने आरोपीला पोस्टेला हजर केल्याने फिर्यादी निलकंठ मगरु ऊईके वय ४७ वर्ष, रा. सितासांवगी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९,५११,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) मोटार सायकलची चोरी. :–**

दिनांक २२/०७/२०१७ चे २०.३० ते २२.०० वा. दर. यातील फिर्यादी विजयकुमार गोविंदराम पंजवानी वय ५० वर्ष, रा. गुरुनानक वार्ड सिंधी कॉलोनी भंडारा हा बहीरंगेश्वर मंदीरा जवळ त्याची मोटार सायकल क्रमांक एमएच ३६ क्यु २८९९ किंमती २०,५००/–रु. ची हिरो होंडा स्पेलंडर काळया रंगाची ठेवुन कार्यक्रम पाहण्यास गेला असता कोणीरती अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. आत्राम पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन भांडण व शिवीगाळ करुन लोखंडी बादलीने डोक्यावर मारुन जखमी केले व मारण्या पिटण्याची धमकी दिली . :–**

दिनांक २२/०७/२०१२ चे २२.०० वा. दर. यातील फिर्यादी प्रकाश मारोतीराम पडोळे वय ४९ वर्ष, रा. टेकेपार हा आरोपी क्र. १ ला तुम्हच्या घराचे स्लॅपचे पाणी माझ्या घराकडे पडते असे हटकले असता आरोपी क्र. १ ते ४ यांनी तोंडा तोंडी भांडण केले तेव्हा फिर्यादीचा जखमी भाऊ रमेश पडोळे हा भांडण सोडवण्यास आला असता त्यास आरोपी क्र. ३ ने लोखंडी बादलीने डोक्यावर मारुन जखमी केले व फिर्यादी हा भांडण सोडवण्यास गेला असता आरोपी क्र. २ व ३ ने थापड बुक्यानी मारपीट केली व आरोपी क्र. १ ते ४ नी संगनमत करुन फिर्यादी व जखमीला शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,३२३,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मुटकुरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

५) अवैध दारु अडयावर धाडी . :–

दिनांक २३/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, तुमसर, सिहोरा, पालांदुर व लाखांदुर येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून ४० लिटर हा.भ. दारू किंमती ३६००/–रु. तसेच ९ लिटर ५४० मिली लिटर देशी विदेशी दारू किंमती ३९४०/–रु. असा एकुण किंमती ७५४०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(ऐ.टी. सुनगार)
स.पो.निरीक्षक
नियत्रंण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९८२३१२३३३६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.